

# खरीप हंगामातील तीळ लागवड



**प्राचार्य डॉ. मधुकर बेडीस**
(मो.नं. ९८५०७७८२९०)
**डॉ. सुदाम पाटील**
**प्रा. हरिश्चंद्र महाजन**
अखिल भारतीय समन्वित तीळ सुधार प्रकल्प,
तेलबिया संशोधन केंद्र, जळगाव

प्राचीन काळात सर्वात प्रथम तीळ या तेलबिया पिकाचा शोध लागला. खाद्यतेल म्हणून हे पीक सर्वात उपयोगी आहे. तसेच सर्वात कमी असंपृक्त मेदाम्ले (लिनोलेईक) असल्याने मानवी शरीरात कोलेस्टेरॉलची पातळी संतुलित करण्यास मदत करते. म्हणजेच हृदयरोगावर ते अतिशय गुणकारी आहे. तसेच सांधेदुखीवर नियंत्रण करण्याकरिता उत्तम आहे. तीळ तेलात सिसामिन आणि सिसामोल हे दोन महत्त्वाचे घटक असल्याने आयुर्वेदात तीळ पिकास अनन्यसाधारण महत्त्व आहे. नव्याने तीळ लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी महत्त्वाच्या काही गोष्टी खालीलप्रमाणे थोडक्यात सांगता येतील.

* जमीन : खोल नांगरून तयार करावी.
* शेणखत : ५ टन/ हेक्टरी जमिनीत टाकावे.
* जमीन भुसभुशीत करून फळी मारून सपाट करावी.
* पेरणी : बैल पाभरीने करावी.
* बियाणे पेरणीची खोली : जमिनीत २.५ सेंटीमीटर इतक्या खोलीवर बियाणे पेरावे.
* जमिनीत २.५ सेंटीमीटरपेक्षा जास्त खोलीवर टाकल्यास बियाणे उगवत नाही. म्हणून पेरणी करताना योग्य ती काळजी घ्यावी.
* ट्रॅक्टरने पेरणी करू नये. कारण ट्रॅक्टरला लावलेल्या पाभरीने बियाणे २.५ सेंटीमीटर खोलीवर न पडता त्याहून अधिक खोलीवर पडून पुढे उगवणक्षमता अतिशय कमी होते. म्हणून ट्रॅक्टरने पेरणी करणे टाळावे.
* वाळलेल्या शेणाच्या गोवऱ्या कुटून बारीक पावडर तयार करून चाळणीने गाळून घ्यावी. या पावडरमध्ये तीळ बियाणे एकत्रित करून पाभरीने पेरणी करावी.
* साधारणपणे १ किलो बियाण्यांत ५ किलो गोवऱ्या कुटलेली पावडर एकत्रित करून पाभरीने पेरणी करावी.
* पेरणी अंतर : ४५ x १० सेंटीमीटर अंतरावर करावी.
* बियाणे : २.५ किलो/ हेक्टर तीळ बियाणे वापरावे.
* सुधारित जाती : जे.एल.टी. ४०८, फुले तीळ नं.१, ए केटी-१०१, एन टी-११, जी-१

* **पेरणीची वेळ** : १५ जून ते १५ जुलै. * **खत व्यवस्थापन** : ५० किलो नत्र/हेक्टरी विभागून द्यावा. * पहिला नत्राचा हप्ता : २५ किलो नत्र/हेक्टरी पेरणीचे वेळी द्यावा. * दुसरा नत्राचा हप्ता : २५ किलो नत्र/हेक्टरी पीक ३० दिवसांचे पीक झाल्यानंतर द्यावा. * जमिनीत पुरेसा ओलावा असताना पेरणी करावी. * तीळ हे पीक जास्त पाण्याला अतिशय संवेदनशील असल्याने दलदल असलेल्या भागात पेरणी करू नये. * **विरळणी** : पीक उगवण झाल्यानंतर पहिली विरळणी १५ दिवसांनी करावी. दुसरी विरळणी ३० दिवसांनी करावी. * **पीकसंरक्षण** : तीळ पिकावर पाने कुरतडणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास क्विनॉलफॉस १ मि.लि. प्रतिलिटर पाणी याप्रमाणे पिकावर फवारणी करावी. * **कोळपणी** : पेरणीचे अंतर ४५ x १० सेंटीमीटर असल्याने बैल कोळप्याने पहिली कोळपणी पीक ३० दिवसांचे असताना करावी. * प्रथम निंदणी : पीक ३० दिवसांचे असताना करावी. * दुसरी कोळपणी : ४५ दिवसांनी करावी. * दुसरी निंदणी : तणांची तीव्रता बघून पीक ६० दिवसांचे असताना दुसरी निंदणी करावी. * पीक काढणी : साधारणपणे तिळाच्या बोंड्या पिवळसर झाल्यावर कापणी करावी. * कापणी केल्यावर पेंढ्या बांधून त्यांच्या खोपड्या करून वाळवाव्यात. * साधारणपणे काढणीनंतर १० ते १५ दिवस पेंढ्या वाळवाव्यात. त्यानंतर जागेवरच तीळ बियाणे पेंढ्या उलट्या करून झटकून घ्यावे.
* उत्पन्न : ७ ते ८ क्विंटल/ हेक्टरी. ■